कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंदणीकृत संस्थेची स्थापना करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.कौविका-२०१०/(१७७/२०१०)/व्यशि-५
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ डिसेंबर, २०१०.

पहा : १. शासन निर्णय क्र.आयटीआय-२००८/(२६४/०८)/व्यशि-२, दि. १३ ऑगस्ट, २००८.
२. शासन निर्णय क्र.कौविका-२०१०/(३/१०)/व्यशि-५, दि. १९ मे, २०१०.
३. D.O. Letter No.DGET-5/1/2010-MES/IS(Pt.I), dated 21st October, 2010 from the Directorate General of Employment & Training, New Delhi.

**प्रस्तावना-** मा.पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकासासंदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची (Prime Minister's National Council on Skill Development) स्थापना करण्यांत आली आहे. मा.पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यांत आलेली राष्ट्रीय कौशल्य विकास परिषद ही प्रामुख्याने कौशल्य विकास संदर्भातील महत्त्वाची राष्ट्रीय धोरणे ठरविणे, वित्तीय व प्रशासकीय अंमलबजावणी संदर्भातील निर्णय घेणे, कौशल्य विकास संदर्भातील कार्यवाहीबाबतच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेणे, आवश्यकतेनुसार याबाबतच्या ध्येय धोरणामध्ये बदल / सुधारणा सुचविणे, त्याचप्रमाणे कौशल्य विकासाच्या दृष्टीने सरकारी व खाजगी क्षेत्रामध्ये समन्वय साधणे या उद्देशाने गठीत करण्यांत आली आहे. सदरहू कौशल्य विकास परिषदेने ५०० दशलक्ष कुशल मनुष्यबळाची निर्मिती सन २०२२ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. याअनुषंगाने राज्यस्तरावर सन २०२२ पर्यंत ४.५ कोटी एवढे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याचे वार्षिक उद्दिष्ट ठरविण्यांत आलेले आहे.

२. उपरोक्त बाब विचारांत घेऊन राज्यामध्ये कुशल मनुष्यबळाची निर्मिती होण्यासाठी संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत "मॉडयुलर एम्प्लॉएबल स्किल्स" (एम.ई.एस.) ही योजना राबविण्यांत येत आहे. आतापर्यंत या योजने अंतर्गत इलेक्ट्रिकल, इलेक्टॉनिक्स, ऑटोमोबाईल, रिटेल, पर्यटन, माहिती व तंत्रज्ञान, कृषि, रसायन, बँकिंग व अकौटिंग, विमा, टेक्सटाईल, हॉस्पिटॅलिटी, फॅब्रीकेशन, गारमेंट मेकिंग, इ. विविध ६१ क्षेत्रातील सुमारे ११५८ अभ्यासक्रम तयार करण्यांत आलेले आहेत. शालेय शिक्षणातून गळती झालेले विद्यार्थी, सद्यस्थितीमध्ये कारखान्यात / औद्योगिक आस्थापनेत काम करीत असलेले अकुशल कामगार, औ.प्र.संस्थेतील विद्यार्थी इत्यादीना त्यांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी व्यवसायाचे प्रशिक्षण देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

३.	राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाच्या संदर्भात राष्ट्रीय स्तरावर चालना देण्यासाठी केंद्र शासनाने उपरोक्तप्रमाणे गठीत केलेल्या राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेच्या धर्तीवर राज्यातील राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाला चालना देण्याच्या दृष्टीने मा.मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय शिखर परिषदेची तसेच सदरहू शिखर परिषदेस सहाय्य करण्याच्या दृष्टीने मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीची स्थापना संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार करण्यांत आलेली आहे.

४.	राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत विविध योजना राबवून राज्यामध्ये कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यांत येणार आहे. संदर्भ क्र.३ नुसार राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाची उत्कृष्ट अंमलबजावणीकरीता राज्यामध्ये सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० अंतर्गत राज्य नोंदणीकृत संस्था स्थापन करुन सदरहू सोसायटीच्या नांवाने राष्ट्रीयकृत बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडण्यांत यावे व या खात्यावर आर्थिक व्यवहार करण्यांबाबतचे निर्देश केंद्र शासनाने दिले आहेत.

५.	राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाची व्याप्ती विचारांत घेता राज्यामध्ये सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था स्थापन करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती व त्याअनुषंगाने याबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग यांचेकडून पडताळणी करुन घेण्यांत आला आहे.

**<u>शासन निर्णय</u>** :- उपरोक्त पार्श्वभूमीवर राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम या योजनेसाठी सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार "State Management Committee of Skill Development Initiative for Maharashtra State" या नांवाने नोंदणीकृत संस्थेची स्थापना करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. या संदर्भात सोसायटी स्थापन करण्यांबाबतची पुढील कार्यवाही संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांनी तात्काळ करावी.

हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१०१२२९१८११०७००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सीमा ढमढेरे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

मा.राज्यपाल यांचे मुख्य सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री. उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री. उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.सचिव, कामगार व सेवयोजन मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली.
मा.महासंचालक, रोजगार व प्रशिक्षण संचालनालय, नवी दिल्ली.
मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व सहसचिव / उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्र.संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई.
सहसंचालक/उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई / नाशिक / औरंगाबाद / पुणे / अमरावती / नागपूर. [संचालक (प्रशिक्षण) यांचेमार्फत]
महालेखापाल (लेखा परीक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, [संचालक (प्रशिक्षण) यांचेमार्फत]
कार्यासन व्यशि-१,२, ३,४.
निवड नस्ती (व्यशि-५) २ प्रती.